POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-०५ ● मुंबई, मंगळवार, ५ ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुस्लिम मुख्याध्यापक नको !

## शाळेतील टाकीत विष टाकले; श्रीराम सेनेचा तालुकाध्यक्ष अटकेत

**■बंगळुरू। प्रतिनिधी,**

मुस्लिम मुख्याध्यापकाला हटवण्यासाठी शाळेच्या पाण्याच्या टाकीत विषारी रसायन टाकल्याचा धक्कादायक प्रकार कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यात घडला आहे. या प्रकरणी श्रीराम सेनेचा तालुका अध्यक्ष सागर पाटील याच्यासह नागनगौडा पाटील व कृष्णा मदार यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकारामुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.



गेल्या १३ वर्षांपासून हुलीकट्टी परिसरातील सरकारी शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या सुलेमान गोरीनाईक यांच्यावरील वैयक्तिक रागातून आणि त्यांची प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने शाळेतील पाण्याच्या टाकीत विषारी द्रव्य मिसण्याचा भयंकर प्रकार करण्यात आला. त्यामुळे १२ विद्यार्थी आजारी पडले , त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सध्या सर्वांची प्रकृती स्थिर आहे. मात्र या घटनेने शाळा प्रशासन आणि पालकवर्गात भीती व चिंता पसरली आहे. हे कृत्य करण्यासाठी आरोपींनी एका पाचवीच्या विद्यार्थ्याचा वापर केल्याची बाब उघड झाली आहे. पोलीस चौकशीत या विद्यार्थ्याने सांगितले की, कृष्णा मदार याने त्याला हे विषारी द्रव्य टाकायला सांगितले होते. सागर पाटील व नागनगौडा पाटील या दोघांनी कृष्णा मदारला आंतरजातीय प्रेमसंबंध उघड करण्याची धमकी देऊन हे कृत्य करण्यास प्रवृत्त केले. त्यांना शाळेत मुस्लीम मुख्याद्यापक नको होता. सागरने पोलीस चौकशीत गुन्ह्याची कबुली दिली आहे.

## आरक्षित केलेले भूखंड सिडकोने बिल्डरांच्या घशात घातले, नवी मुंबई महापालिका आक्रमक

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

स्वच्छ , सुंदर आणि सुटसुटीत शहर म्हणून देशात नवी मुंबई शहराची ओळख आहे. एका बाजूला शहराला लाभलेला खाडी किनारा, तर दुसऱ्या बाजूला उद्यानांची हिरवळ. यामुळे नवी मुंबईला ग्रीन आणि फ्लोमिंगो शहराचा बहुमान मिळाला आहे. मात्र याच शहराला सिमेंटच्या जंगलात रूपांतर करून नख लावण्याचे पाप सिडको करीत आहे. कारण आहे महानगरपालिकेने आरक्षित केलेल्या मोकळ्या जागांवर सिडकोने काढलेली भूखंड लॉटरी.

सिडकोने 31 जुलै रोजी काढलेल्या भूखंड लॉटरीतून कोट्यवधी रुपयांचा मलिदा आपल्या खात्यात टाकला. मात्र हे करत असताना शहराच्या मूलभूत गरजांसाठी महापालिकेने आरक्षित केलेले भूखंड सिडकोने बिल्डरांच्या घशात घातले आहेत. सिडकोने 48 भूखंडाची सोडत काढली . यामध्ये नेरूळ सेक्टर 28 मधील 5.5 एकराच्या जागेचा समावेश आहे.



या चार भूखंडावर महापालिकेने विकास आराखड्यात आरक्षण टाकलेले आहे.

### चार भूखंडांची विक्री

महापालिकेने राज्य सरकारकडे पाठविलेल्या विकास आराखड्याला मंजुरी देण्यात आलेली आहे. कोणत्या जागेवर कोणते आरक्षण आहे याची माहिती सिडकोलाही कळविण्यात आली होती. मात्र हे माहीत असतानाही सिडकोने नेरूळ सेक्टर 28 मधील आरक्षित असलेल्या चार भूखंडांची विक्री केली. या मध्ये नेरूळ सेक्टर 28 मधील फ्लॉट नंबर 12 अ, इ, उ, ऊयांचा समावेश आहे.

### कोट्यवधी रुपयांसाठी भूखंड बिल्डरांच्या घशात

प्लॉट नंबर 12 अ या भूखंडावर पालिकेने सार्वजनिक मैदान, इ वर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग केंद्र, उ वर उद्यान आणि ऊ वर उद्यान, पोलीस ठाणे प्रस्तावित केले आहेत. शहरातील वाढती लोकसंख्या पाहता महानगरपालिकेने मैदान, उद्यान, जॉगिंग ट्रॅक, सार्वजनिक बहुउद्देशीय इमारती आदींसाठी जागा राखीव ठेवल्या आहेत. येथील जनतेला मोकळा श्वास घेता यावा असा यामागील उद्देश आहे. मात्र सिडकोने कोट्यवधी रुपयांसाठी भूखंड विकून शहराला सिमेंटचे जंगल बनवण्यास सुरवात केली आहे.

### महापालिकेचा विरोध कायम

सिडकोने आरक्षित भूखंड विकले असले तरी याला परवानगी न देण्याचा निर्णय नवी मुंबई महापालिकेने घेतला आहे. विकास आराखड्याला सरकारने मान्यता दिल्याने आता कायदेशीररित्या आरक्षित जागा सिडकोला विकता येणार नाहीत. याबाबत आम्ही शासनाला कळविणार आहोत. सिडकोने असे करण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित बांधकाम व्यावसायिकांना इमारत उभारण्यासाठी लागणाऱ्या कायदेशीर परवानग्या महापालिका देणार नसल्याचे नगररचना सहाय्यक संचालक सोमनाथ केकाण यांनी सांगितले आहे.

## लोकलमध्येही महिला सुरक्षित नाहीत ! पोलिसानेच केले महिलेसोबत घाणेरडे कृत्य




मुंबई :

मुंबई लोकलमधील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे . सुरक्षेसाठी नेमलेले सुरक्षारक्षकच महिलांच्या जीवावर उठले आहेत . मुंबई लोकल मध्ये घडलेल्या धक्कादायक घटनेने महिला प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे . मुंबईतील लोकल ट्रेनच्या महिला डब्यात पोलिस कॉन्स्टेबलला मद्यधुंद अवस्थेत एका महिला प्रवाशाशी गैरवर्तन केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. बोरिवली-वसई स्लो लोकल ट्रेनमध्ये ही घटना घडली आहे . आरोपी कॉन्स्टेबलचे नाव अमोल किशोर सपकाळे असे आहे, जो मीरा भाईंदर आणि वसई-विरार पोलिस आयुक्तालयात तैनात आहे. दरम्यान कॉन्स्टेबल सपकाळे मीरा रोड स्टेशनवर महिला डब्यात चढला . प्रवाशांचे तिकीट तपासण्याचे नाटक करत त्याने काही महिला प्रवाशांना मागून जाणूनबुजून त्यांना स्पर्श केला. हे महिलांच्या लक्षात आल्या नंतर एका महिलेने चोरून त्या पोलीस कॉन्स्टेबल चा व्हिडिओ काढला . सदर आरोपी महिला प्रवाशांकडे घाणेरड्या नजरेने पाहत होता, त्यांना अस्वस्थ करत होता, असा आरोप उपस्थित महिलांनी केला . त्याचे हे वर्तन रेकॉर्ड करण्याचा प्रयत्न करणाऱ्या काही महिलांचे मोबाईल फोनही हिसकावून त्याने घेतले. अखेर काही महिलांनी त्याला नायगाव स्टेशन वर डब्यातून खाली उतरवले आणि स्टेशन मास्टरकडे तक्रार दाखल केली. माहिती मिळताच वसई रोड रेल्वे पोलिसांचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी सपकाळे याला ताब्यात घेतले. एका प्रवाशाने केलेल्या तक्रारीवरून त्यांनी महिलांच्या विनयभंगाचा आणि त्यांना धमकावण्याचा गुन्हा दाखल केला आहे. अधिकाऱ्यांनी कॉन्स्टेबलवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. एका कायदा अंमलबजावणी अधिकाऱ्याच्या धक्कादायक वर्तनामुळे प्रवाशांमध्ये संताप निर्माण झाला आहे आणि ट्रेनमध्ये महिलांच्या सुरक्षिततेबद्दल गंभीर चिंता निर्माण झाली आहे.

## ज्या पात्र लाभार्थी विधवा भगिनींना विधवा पेन्शन मागील काही महिन्यापासून येत नाही त्यांनी आधार वेरिफिकेशन, आधार लिंक, आधार मॅपिंग व आधार ॲक्टिव्ह करावे

**■पालघर। प्रतिनिधी,**

जून महिन्यात काही विधवा भगिनी शिवसेनेचे प्रवक्ते श्री काळे यांच्याकडे तक्रार घेऊन आल्या होत्या, मागील चार-पाच महिन्यापासून विधवा पेन्शन मिळाले नाही, अशी त्या विधवा भगिनींची तक्रार होती, भगिनींना घेऊन पालघरचे तहसीलदार यांना श्री केदार काळे भेटले, त्यांना विधवा पेन्शन मिळून देण्यासाठीविनंती केली तसे पत्रही दिले. दोन दिवसांपूर्वी तहसीलदार कार्यालयातून श्री केदार काळे यांना पत्र प्राप्त झाले, सोबत शेकडो महिलांची यादी दिली आहे त्यांचं पेन्शन बंद झालेला आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्त वेतन योजना ह्या योजनेतील पात्र लाभार्थ्यांनी आपले आधार बँक बुक व मोबाईलची लिंक करणे गरजेचे आहे ज्या लाभार्थ्यांनी हे लिंक केलं नसेल त्यांना लाभ मिळत नाही म्हणजेच थोडक्यात त्यांचे पेन्शन त्यांच्या खात्यात जमा होत नाही.




जे पात्र लाभार्थी आहेत व मागील काही महिन्यापासून त्यांच्या बँक खात्यात पैसे जमा होत नाहीत त्यांनी आपला आधार कार्ड बँक पासबुक व आधार लिंक असलेला मोबाईल घेऊन तहसीलदार कार्यालयात जाऊ तहसीलदार किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना भेटावं तत्काळ डाटा एन्ट्री करून पुढील महिन्यापासून त्यांच्या बँक खात्यावर त्यांचा मासिक लाभ जमा होईल. असे आश्वासन शिवसेनेचे प्रवक्ते श्री केदार काळे यांना पालघर तहसीलदार श्री रमेश शेंडगे यांनी दिले आहे.

श्री काळे यांची सर्व विधवा भगिनींना विनंती आहे , पात्र विधवा भगिनींनी लगेचच आपलं बँक बुक घेऊन ,आधार कार्ड घेऊन व लिंक असलेला मोबाईल घेऊन संबंधित तहसीलदार कार्यालयात जावे व आपलं पेन्शन सुरू करून घ्यावं. सर्व योजना शासनाने आपल्यासाठीच दिलेले आहेत त्याचा लाभ आपण जरूर घ्यावा काही अडचण असल्यास श्री केदार काळे म्हणाले त्यांना कधीही येऊन भेटा आपल्या भगिनींना मदत करण्यास सदैव तयार आहेत.

## मुंबईत ५१ कबुतरखाने बंद... पक्ष्यांना खायला घालण्यास पूर्णपणे बंदी! आतापर्यंत १०० जणांहून अधिक लोकांना ठोठावला दंड

**■मुंबई । प्रतिनिधी,**

कबुतरांना खायला देण्यावरील बंदी लागू झाल्यापासून, बीएमसीने दादर कबुतरखान्यात १०० हून अधिक लोकांना दंड ठोठावला आहे. कबुतरांना खायला देऊन बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध एफआयआर आणि फौजदारी तक्रारी दाखल करण्याचा अधिकार मुंबई उच्च न्यायालयाने बीएमसीला दिला आहे, ज्यामध्ये जर एखाद्या व्यक्तीने वारंवार आदेशाचे उल्लंघन केले तर त्याला अटक होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र सरकारच्या निदेर्शानुसार आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, बृहन्मुंबई महानगरपालिकेने (इटउ) दादर कबुतरखान्यात कबुतरांना खायला देण्यावर अधिकृतपणे बंदी घातली आहे. बीएमसीने २ ऑगस्ट रोजी दादर कबुतरखान्याविरुद्ध धडक कारवाई करत, ते मोठ्या ताडपत्रीने झाकत बंद केले आहे. मात्र तरीसुद्धा अनेक पक्षीप्रेमी तिथे येऊन कबूतरांना धान्य देण्याचा प्रयत्न करताना दिसून आले आहे. ज्यामुळे आतापर्यंत शंभराहून अधिक लोकांना दंड ठोठावण्यात आल्याचे वृत्त आहे. कबुतरांच्या विष्ठेमुळे श्वसनाचे आजार आणि संसर्ग होण्याची शक्यता असल्यामुळे, दादरसारख्या खास गर्दीच्या भागात, गंभीर आरोग्य धोके उद्भवण्याच्या पार्श्वभूमीवर ही बंदी लागू करण्यात आली आहे. मुंबईतील ५१ कबुतरखाने बंद करण्याचे कारण दिनांक ३ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र विधान परिषदेच्या अधिवेशनादरम्यान, मंत्री उदय सामंत (शिवसेना नेते) यांनी कबुतरांच्या विष्ठेमुळे आणि पिसांमुळे श्वसनाचे आजार होण्याचा धोका असल्याचे सांगत, मुंबईतील ५१ कबुतरखाने तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले. यानंतर, बीएमसीने कबुतरखान्यातील कबूतरांमुळे संभाव्य श्वसनाचे आजार लक्षात घेता शहरव्यापी कारवाई सुरूवात केली, त्यानुसार कबुतरांना खायला घालणाऱ्यांना दंड ठोठावले आणि शहरातील अनेक कबुतरखाने बंद केली. कबुतरखाना बंदीविरुद्ध अनेकांनी विरोध केला. मात्र, १५ जुलै रोजी

## सप्टेंबर महिन्यात देशात मोठी घडामोड होणार?

## मोदी-शाहांनी राष्ट्रपतींची भेट घेताच ठाकरेंच्या नेत्याचा मोठा दावा



### काय म्हणाले होते निशिकांत दुबे?

ह्लमुंबई, महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी उत्तरप्रदेश, बिहार आणि हिंदी भाषिक लोकांचे मोठे योगदान राहिले आहे. आजही आम्ही तितकेच योगदान देत आहोत,ह्व असे वादग्रस्त विधान भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी केले होते.

### संजय राऊतांचे दुबेंना प्रत्युत्तर

संजय राऊत यांनी निशिकांत दुबे यांच्या विधानाला देखील प्रत्युत्तर दिले आहे. १०६ हुतात्मांच्या बलिदानातून ही मुंबई आपल्याला महाराष्ट्रासह मिळालेली आहे. ते १०६ हुतात्मे दुबे, चौबे, मिश्रा नाही, हे या निशिकांत दुबे यांनी समजून घेतलं पाहिजे. छातीचा कोट करुन महाराष्ट्र, मराठी माणूस, गिरणी कामगार लढला तेव्हा ही मुंबई मराठी माणसाला मिळाली. तुम्ही मुंबईत पैसे कमवायला, घाम गाळायला आला म्हणजे मुंबई ओरबडायला आला का, तुमच्या राज्यात नोकरी उद्योग धंदा नसल्याने मुंबईत आला. नाहीतर तुम्ही कशाला याल. मराठी माणसाच्या पोटावर मारुन तुम्ही ही मुंबई लुटत आहात, हे देखील तितकंच खरं आहे, असेही संजय राऊतांनी सांगितले.

**■नवी दिल्ली । प्रतिनिधी,**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ३ ऑगस्ट रोजी राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. काही वेळानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील राष्ट्रपतींची भेट घेतली.

एकाच वेळी अचानक दोन मोठ्या नेत्यांनी राष्ट्रपतींची भेट घेतल्याने राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे. यावेळी महत्त्वाच्या मुद्यावर चर्चा झाल्याचे देखील म्हंटले जात आहे. या भेटींवरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सप्टेंबर महिन्यात देशात महत्त्वाच्या राजकीय घडामोडी घडू शकतात, असा दावा केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, राष्ट्रपतींना पंतप्रधान भेटणे हा त्यांच्या कामाचा एक भाग आहे. ते राष्ट्रपतींना भेटायला जातात हेच महत्त्वाचे आहे. राष्ट्रपतींना ते भेटायला बोलवत नाही, ही बातमी आहे. सध्या आपल्या देशात राष्ट्रपतींचे अधिकार काय आहेत? हे आपल्याला माहित आहे. राष्ट्रपतींच्या सल्ल्याने सरकार किती काम करते हे सुद्धा आपल्याला माहित आहे. या देशात सध्याच्या कामाची एकंदरीत परिस्थिती पाहता काहीही होऊ शकते, असे देखील त्यांनी म्हटले आहे.

आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एक महत्त्वाची बैठक आहे. त्या बैठकीत सुद्धा महत्त्वाच्या भविष्यातल्या घडामोडींवर चर्चा होण्याची शक्यता आहे. जे सातत्याने सांगितले जात आहे की, सप्टेंबर महिन्यात या देशात महत्त्वाच्या राजकीय घडामोडी घडतील. आम्हालाही वाटतं की, सप्टेंबर महिन्यात या देशात महत्त्वाच्या राजकीय घडामोडी घडू शकतात, असे सुचक विधान संजय राऊत यांनी केले आहे.

## श्रीकांत शिंदेंनाही भाजप घेरणार, होम ग्राउंडवर रविंद्र चव्हाण आक्रमक

**■ठाणे । प्रतिनिधी,**

ठाणे महापालिकेत भाजपकडून स्वबळाची तयारी केली जात असताना आता दुसरीकडे बाजूच्या कल्याण डोंबिवली महापालिकेतही स्वबळाचे संकेत देण्यात आले आहेत.श्रीकांत शिंदेंनाही भाजप घेरणार, कल्याण-डोंबिवलीत शड्डू ठोकला, होम ग्राउंडवर रविंद्र चव्हाण आक्रमककल्याणः आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपकडून जोरदार मोचेर्बांधणी सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राज्यातील बहुतांशी ठिकाणी 'शत प्रतिशत'चा नारा भाजपकडून देण्यात आल्याची चर्चा आहे. त्यानुसारच आता भाजपकडून महापालिका निवडणुकांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. ठाणे महापालिकेत भाजपकडून स्वबळाची तयारी केली जात असताना आता दुसरीकडे बाजूच्या कल्याण डोंबिवली महापालिकेतही स्वबळाचे संकेत देण्यात आले आहेत. कल्याण-डोंबिवली महापालिकेचा पुढील महापौर भाजपचा असावा असे



वक्तव्यच प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले आहे.कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने सत्तेची जोरदार तयारी सुरू केली आहे. शहरातील वाढत्या नागरी समस्यांचा मुद्दा उपस्थित करत भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि राज्याचे मंत्री रवींद्र चव्हाण यांनी रविवारी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, ह्लकल्याण-डोंबिवलीचा विकास हवा असेल तर महापौरांच्या खुर्चीवर भाजपचाच नगरसेवक बसला पाहिजे.ह्वकल्याणमधील महाजनवाडी येथील सभागृहात आयोजित एका कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते जतिन प्रजापती आणि त्यांच्यासोबत शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी रवींद्र चव्हाण यांनी नवख्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत स्पष्ट संदेश दिला. त्यांनी म्हटले की, ह्रपक्षात प्रवेश केलात, याचा अर्थ निवांत बसणं नाही. लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी तुम्ही पालिका आणि प्रशासकीय यंत्रणांशी लढा द्या, असे त्यांनी म्हटले.शिवसेना शिंदे गटात अस्वस्थता...भाजपच्या या कार्यक्रमामुळे आणि कल्याण परिसर ह्यभाजपमयह्ण करण्याच्या सूचनांमुळे शिवसेना शिंदे गटात गोटात अस्वस्थता पसरली आहे. गेल्या दोन दशकांपासून कल्याण-डोंबिवली पालिकेवर शिवसेना-भाजप युतीची सत्ता आहे. मागील निवडणुकीत शिवसेना सरस ठरली होती.

शिवसेनेतील फुटीनंतर या ठिकाणी शिंदे गटाची पकड अधिक मजबूत असल्याचे सांगण्यात आले.आता मात्र, भाजप थेट महापौर पदासाठी दावा ठोकला आहे. पालिकेतील सत्ता संतुलनासाठी दोन्ही पक्षांमध्ये रस्सीखेच होण्याची शक्यता अधिकच गडद झाली आहे. एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या लोकसभा मतदारसंघात कल्याण-डोंबिवलीचा समावेश होतो. त्यामुळे कडोंमपात भाजपचा महापौर आल्यास त्याचा परिणाम लोकसभा मतदारसंघाच्या समीकरणांवरही होण्याची शक्यता आहे



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# जराही लाज नाही..

महाराष्ट्र सरकारने जून २०२४ मध्ये सुरू केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत भ्रष्टाचार आणि गैरप्रकार झाल्याबद्दल बोंबा मारल्या जात आहेत. पण या भ्रष्टाचार आणि गैरप्रकारांचे वैशिष्ट्य असे की ते या योजनेची अंमलबजावणी करणारे कर्मचारी, प्रशासन किंवा सरकार यापैकी कोणीही केलेले नाहीत. काही ठिकाणी संगनमत निश्चित असू शकते. पण जो काही गैरप्रकार आणि भ्रष्टाचार आहे जवळपास तो साराच जनतेने, या राज्यातील लोकांनी केलेला आहे, अगदी निलाजरेपणाने..! सामाजिक भान, जाणीव, कर्तव्य, नैतिकता वगैरे सारेकाही धाब्यावर ठेवून केलेला आहे. 'लाडकी बहीण' ही महिलांचे किंचित आर्थिक सक्षमीकरण आणि विकासासाठी एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा उद्देश २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपयांचे आर्थिक सहाय्य प्रदान करणे हा आहे. ज्यामुळे त्यांचे आरोग्य, पोषण आणि कुटुंबातील निर्णायक भूमिका मजबूत होईल. त्यात लाभार्थी महाराष्ट्राची कायमस्वरूपी रहिवासी असावी. तिचे वय २१ ते ६५ वर्षे असावे. तिच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाखांपेक्षा कमी असावे, आधार संलग्न बँक खाते असावे, विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, निराधार महिलांना प्राधान्य आणि प्रत्येक कुटुंबातील एका अविवाहित महिलेला लाभ, अशा यातील प्राथमिक तरतुदी आहेत. या योजनेसाठी राज्य सरकारने ४६००० कोटींचा निधी मंजूर केला आहे, आणि आतापर्यंत २.५० कोटींहून अधिक महिलांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. मात्र, या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसोबतच अनेक गैरप्रकार आणि अनियमितता उजेडात येत आहेत. या लाडक्या बहिणीने लाखो महिलांना लाभ दिला असला, तरी त्यातील गैरप्रकारांनी प्रशासकीय कमकुवतपणा आणि काही प्रमाणात भ्रष्टाचारही उघड केला आहे. योजनेतील सर्वांत मोठा गैरप्रकार म्हणजे अपात्र व्यक्तींनी घेतलेला लाभ हा आहे. यातील नुकतीच उघडकीस आलेली सर्वांत गंभीर आणि लाजिरवाणी बाब म्हणजे चक्क १४२१८ ह्यपुरुषांनीह्ल स्वतःला स्त्री दाखवून आतापर्यंत २१.४४ कोटी लाटले आहेत. यात काही प्रकरणांमध्ये पुरुषांनी महिलांच्या नावाने अर्ज केले, तर काहींनी बनावट कागदपत्रांचा वापर करून योजनेचा लाभ उचलला आहे. यामुळे आणि सरकारी यंत्रणेतील त्रुटींमुळे सरकारी निधीचा गैरवापर झाला. आतापर्यंत एकूण अडीच कोटी महिला लाभार्थींपैकी सुमारे २६ लाखांहून अधिक अपात्र व्यक्तींनी, म्हणजेच अपात्र महिला आणि पुरुष या दोघांनीही या योजनेचा लाभ घेतला. यामध्ये प्रामुख्याने ज्यांचे कौटुंबिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे अशा महिला आहेत. त्या आयकरदाता कुटुंबातील आहेत किंवा सरकारी नोकरीत आहेत. काही प्रकरणांमध्ये बनावट उत्पन्न प्रमाणपत्रे सादर केली गेली आहेत. विशेषतः गोंदिया आणि भंडारा नगर परिषदांमध्ये हजारो अपात्र महिलांची यादी जाहीर झाली आहे, ज्यामध्ये उत्पन्न मर्यादा ओलांडणाऱ्या महिलांचा समावेश आहे. या अपात्र बहिणींमध्ये निवृत्त महिला कर्मचाऱ्यांसह ९५२६ सरकारी महिला कर्मचाऱ्यांचाही समावेश होता, ज्या सर्वच या योजनेच्या निकषांनुसार अपात्र होत्या. या महिलांनी त्यांचे सरकारी कर्मचारी असल्याचे तथ्य लपवले आणि पूर्णपणे अपात्र असूनही लाभ उचलला. यातील संतापजनक बाब म्हणजे नोकरीत असणाऱ्यांसोबतच बहुतांश सेवानिवृत्त महिला उत्तम निवृत्तिवेतन घेणाऱ्या असल्याचे आढळून आले आहे. सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी लाभ घेतल्याने योजनेच्या विश्वासार्हतेवर परिणाम झाला आणि सामान्य महिलांमध्ये असंतोष निर्माण झाला. योजनेसाठी अर्ज करताना आवश्यक कागदपत्रांमध्ये आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला आणि बँक खात्याचा तपशील यांचा समावेश आहे. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये बनावट कागदपत्रांचा वापर करून अर्ज सादर केले गेल्याची चीड आणणारी बाब उघड झाली आहे. काही अर्जांमध्ये बनावट उत्पन्न प्रमाणपत्रे सादर केली गेली, ज्यामुळे अपात्र व्यक्तींनी लाभ मिळवला. याशिवाय, आधार कार्ड आणि बँक खात्यांच्या तपशिलात फेरफार केल्याचेही आढळले. याबाबत स्पष्ट आकडेवारी उपलब्ध नसली, तरी एकाच गोंदिया नगर परिषदेत चक्क २७००० अपात्र महिलांची यादी जाहीर केली, ज्यामध्ये बनावट कागदपत्रांच्या वापराचे स्पष्ट संकेत आहेत. यावरून अशा काही गावांमध्ये एखादी अशी कामे करणारी यंत्रणा तर अस्तित्वात आली नव्हती, अशी संशयालाही वाव आहे. लाडकी बहीण योजनेच्या सुरुवातीला अर्ज तपासणी प्रक्रिया कठोर नव्हती. त्यामुळेच अपात्र अर्ज मंजूर झाले. यामागे प्रशासकीय यंत्रणेची अपुरी तयारी आणि कमकुवत तपासणी यंत्रणा कारणीभूत आहे. काही प्रकरणांमध्ये, राजकीय दबावामुळे अपात्र अर्जांना मंजुरी देण्यात आल्याचीही बाब समोर आली आहे. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत काही प्रमाणात का होईना भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळाले. विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर योजनेला गती देण्यासाठी तपासणी प्रक्रिया सौम्य करण्यात आली, ज्यामुळे अनेक अपात्र लाभार्थींना आणि त्यांना घुसवणाऱ्यांना मोकळे रान मिळाले. लाडकी बहीण योजनेतील गैरप्रकारांमुळे २१.४४ कोटींचा निधी अपात्र पुरुष लाभार्थींपर्यंत पोहोचला आहे. तर दुसरीकडे एकूण २६ लाखांहून अधिक अपात्र व्यक्तींनी लाभ घेतल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. अशा योजनांबद्दल अपात्रांमध्ये प्रामुख्याने महिलाच आहेत, हे दुर्दैव. अपात्र व्यक्तींनी लाभ घेतल्याने खऱ्या गरजू महिलांना लाभ मिळण्यात विलंब झाला किंवा काहींना लाभ मिळालाच नाही. गैरप्रकार उघड झाल्याने प्रशासकीय यंत्रणेच्या उरावर तपासणी व दुरुस्तीचे काम येऊन पडले आणि योजनेची गती मंदावली. महाराष्ट्र सरकारने काय उद्देश डोळ्यासमोर ठेवून ही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली हे स्पष्ट आहे. महिलांना काहीतरी रक्कम स्वतःची वाटावी, ती खर्च करण्याचे अधिकार आपल्याला असावेत, हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. या योजनेतील २.५ कोटी लाभार्थींपैकी अक्षरशः लाखो बहिणींना आयुष्यात कधीही बँक खाते आणि त्यात आपले दीड हजार रुपये असा अनुभव नव्हता. एका दृष्टीने विचार केला तर सुमारे ४० हजार कोटी रुपयांचा सरकारी तिजोरीतून खर्च आणि त्यात कवडीचाही भ्रष्टाचार नाही, अशी ही योजना आहे. कारण बहिणीच्या खात्यात पूर्ण १५०० रुपये थेट जात होते. त्यासाठी त्यांना कोणालाही काहीही द्यावे लागत नव्हते. ४० हजार कोटी रुपयांच्या कामांमध्ये ३४ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होतो, एक रुपयापैकी फक्त पंधरा पैसे कामी लागतात, असे आपले पंतप्रधान राजीव गांधी यांनीच सांगितले होते. त्या पृष्ठभूमीवर तर ४० हजार कोटी रुपयांच्या व्यवहारात एका रुपयाचाही भ्रष्टाचार नाही, अशी ही एकदम स्वच्छ योजना होती. पण आमची मानसिकताच पाहा कशी पार रसातळाला गेली आहे. अडीच कोटींपैकी ३६.३४ लाख बहिणी अपात्र ठरणे, १५ हजार पुरुषांनी बहीण बनून तृतीयपंथी होणे, एका योजनेची लाभार्थी असताना हीसुद्धा लाटणे, वयस आणि उत्पन्नमर्यादा धाब्यावर बसवून, सरकारी पगार, निवृत्तिवेतन घेत असणाऱ्या महिलांनीही विविध लांड्यालबाड्या करून हे सारे केल्याचे आता उजेडात आले आहे. हे सारे केले किती रुपयांसाठी, तर फक्त १५०० रुपये ज्यांचे कवडीचेही उत्पन्न नाही किंवा कुटुंबाचे मर्यादित उत्पन्न आहे अशांसाठीच, असे वारंवार सांगितल्यानंतरही २५ लाखांपेक्षा जास्त लबाड बहिणी आणि पंधरा हजार बेशरम किन्नर सापडावेत यापेक्षा लाजिरवाणे आणि किळसवाणे काय असू शकते..? या सर्वांना योजनेबाहेर काढण्यात तर येणारच आहे. पण जवळपास १० हजार सरकारी कर्मचारी महिलांनीही स्वतःबद्दल खोटी आणि सरकारची दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल त्यांना एका फटक्यात घरी बसवायला हवे आहे. दुसरीकडे स्वतःला महिला दाखवून बहीण म्हणवणाऱ्या तथाकथित केविलवाण्या पुरुषांचेही वस्त्रहरण करून फौजदारी झटके द्यायला हवे आहेत, ही महाराष्ट्राचीच इच्छा आहे आणि त्यात अनपेक्षित असे नक्कीच काहीही नाही..!

# गुजरातने महाराष्ट्राची माधुरी हत्तीण पळवली

2014 साली केंद्रात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपची बहुमताची सत्ता आल्यानंतर पुरोगामी आणि प्रगत महाराष्ट्रातील महत्वपूर्ण आणि विकासपुरक गोष्टी गुजरातला हलवण्याचा सपाटा चालवलेला दिसत आहे. त्यातून आता कोल्हापूरकारांशी जीवाभावाचे नाते निर्माण झालेली महादेवी हत्तीणही सुटलेली नाही. शक्ती, संतुलन आणि विवेक याचं उदाहरण म्हणून निसर्गात हत्तीचा सन्मान केला जातो. हिंदू परंपरेत हत्तीला देवाचा प्रतिनिधी म्हणून पाहिले जाते तर बौद्ध परंपरेत हत्तीचा बोधिसत्व म्हणून सन्मान केला जातो. सांचीच्या अशोक स्तंभावर सिंहासोबतच बैल आणि घोडा असून या ठिकाणी हत्तीलाही स्थान आहे. शक्ती, सामर्थ्याचे प्रतीक असलेला हत्ती हिंसेच्या विरोधात असताना त्याच्या सुळ्यांचा उपयोग तो स्वतःसह कमकुवतांच्या संरक्षणासाठी करत असल्याची धारणा आहे. हत्ती गवतभक्षी असल्याने त्यापासून कोणत्याही प्राण्याला कोणताही धोका नाही. तर हत्ती हे नैसर्गिक परिपूर्णतेचे संपूर्ण लक्षण मानले जाते. बौद्ध कथा परंपरेतील हत्ती आणि आंधळ्यांची कथा आपणास माहीत असते, हत्तीच्या विविध अवयवांना स्पर्श केलेल्या अंधांकडून हत्तीचे वेगवेगळे वर्णन केले जाते. हत्तीच्या पायांना स्पर्श केलेल्या अंधासाठी हत्ती स्तंभासारखा मोठा मजबूत असतो, तर हत्तीच्या कानांना स्पर्श केलेल्यांसाठी हत्ती हा ढाळली जाणारी चवरी किंवा धान्य पाखडण्याच्या सूपासारखा वाटतो. शेपटाला स्पर्श करणाऱ्या अंधासाठी हत्ती रश्शीसारखा असतो तर सोंडेला स्पर्श करणाऱ्यासाठी हाच हत्ती एखाद्या अजगरासारखा भासतो. एकाच गोष्टीबाबत माणसांमध्ये वेगवेगळे दृष्टिकोन असू शकतात, एकाच घटनेविषयी माणसांची वेगवेगळी मते, धारणा असू शकतात, ही मते किंवा धारणा म्हणजे संपूर्ण हत्ती नाही, हत्तीविषयी आपापल्या परीने केलेले आकलन आहे. हत्ती ही वस्तुस्थिती असताना त्याविषयी असलेले समज आणि गैरसमज या मानवी मनाने केलेल्या कल्पना असल्याचेही स्पष्ट व्हावे, हत्तीच्या जागेवर व्यक्ती, समाज, धर्म, विचारसरणी, इतिहास, शास्त्र, विज्ञान, जीवन, निसर्ग, तत्वज्ञान अशा कोणत्याही घटकांना ठेवून या कथेचा संदर्भ लक्षात घेता येतो.



कोल्हापुरातील महादेवी हत्तीणीविषयी सरकार, पेटा, कोल्हापूरमधील रहिवासी यांचेही असेच वेगवेगळे संदर्भ आणि मते समोर आली आहेत. महादेवीला परत कोल्हापूरमध्ये आणण्यासाठी नांदणीपासून कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत महादेवीवर प्रेम करणाऱ्या नागरिकांनी आत्मक्लेश मूक पदयात्रा आयोजित केली. तर काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी महादेवीला कोल्हापूरमध्ये परत आणण्यासाठी सह्यांची मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे. मागील 30 वर्षांपासून शिरोळ तालुक्यातील नांदणी येथील स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टारक संस्थान मठात माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीण राहात होती, ती नांदणीत ठिकाणी गुण्यागोविंदाने नांदत होती, असे कोल्हापूरकरांचे म्हणणे आहे. तर मागील सोमवारी न्यायालयाच्या निर्णयामुळे महादेवीला गुजरातमध्ये वनतारा येते रवाना करण्यात आले. महादेवीच्या रवानगीच्या विरोधात मठाने केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्याने महादेवीची गुजरातला रवानगी केली, मात्र कोल्हापूरची ओळख झालेल्या महादेवीला पुन्हा स्वगृही आणण्यासाठी कोल्हापूरकरांनी सुरू केलेल्या चळवळीचे स्वागत होत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रपतींच्या नावे निवेदन देऊन महादेवी हत्तीण परत आणण्याची मागणी नागरिकांनी केली. नांदणीत महादेवीची सेवा सुश्रूषा योग्य प्रकारे होत नसल्याचा आरोप करत प्राणी प्रेमी संघटनेने महादेवीला गुजरातच्या वनताराकडे सुपूर्द करण्याची मागणी केली होती. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील देवस्थान आणि मठातील सर्व हत्ती वनताराला नेण्याचा हा डाव असल्याचा आरोप राजू शेट्टी यांनी केला आहे. तर महादेवीला परत आणण्यासाठी राज्यातील मंत्री आबिटकर यांनी ह्यसरकार कायदेशीर प्रक्रिया करून महादेवीला पुन्हा महाराष्ट्रात घेऊन येईलह्ल असे आश्वासन दिले आहे.

वनविभागाच्या परवानगीशिवाय महादेवीचा मिरवणुकीसाठी वापर केला जात आहे. तिला साखळ्यांनी बांधून ठेवल्याने तिच्या पायांना गंभीर इजा झाल्याचा आरोप करत वन्यजीवांच्या संरक्षणासाठी काम करणाऱ्या संघटना न्यायालयात गेल्या. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने डिसेंबर 2024 मध्ये महादेवीच्या आरोग्य आणि कल्याणासाठी तिला गुजरातमधील वनतारा पशु कल्याण केंद्रात हलवण्याचा आदेश दिला. यासाठी प्राण्यांच्या हक्कांना प्राधान्य देण्याचे निरीक्षण नोंदवले गेले. नांदणी मठाने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले, परंतु सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. या सर्व घडामोडीत महादेवीची मोठी हेळसांड होत आहे. कोल्हापुरात महादेवीची काळजी घेतली जात नसल्याने तिला गुजरातमध्ये नेण्यावर भर देणाऱ्यांनी मागील 30 ते 35 वर्षे किंवा त्याहून अधिक वर्षांपासून महादेवीची काळजी कोल्हापूरमध्येच घेतली जात होती, हे समजून घ्यायला हवे. याचिकाकर्त्यांच्या हेतूवर संशय नाही, परंतु महादेवी कोल्हापुराच्या शिरोळ नांदणीतही सुखाने नांदू शकते. महादेवीच्या स्थलांतरासाठी आग्रही असणाऱ्यांनी महादेवीच्या मनाच्या आरोग्याचा विचार करायला हवा. कोल्हापूरमध्येच महादेवीला ठेवताना तिची जबाबदारी असलेल्यांना सूचना करणे, महादेवीच्या औषधोपचाराची सुविधा करणे, त्यासाठी पुरेशी व्यवस्था करता येणे शक्य आहे. कोल्हापूरमध्येही तिच्या आरोग्यावर चोख लक्ष ठेवता येऊ शकते, त्यासाठी तिच्या स्थलांतराची गरज नाही. महादेवीचे कोल्हापुरातील सांस्कृतिक, धार्मिक महत्व आणि तिच्या स्थलांतराच्या मुद्द्यावरून होणारे राजकारण, भावनिकता, कायदेशीर आग्रह बाजूला ठेवायला हवा. महादेवीच्या शारीरिक आरोग्यासोबतच तिच्या मनाचाही विचार व्हायला हवा. याबाबत कथेतल्या अंधांचे अंदाज कामाचे नाहीत. नांदणीतच महादेवीचे मन नांदत असेल तर त्याचाही विचार व्हायला हवा.

# आपण सारे भाऊ भाऊ, सोयीनुसार गप्प राहू!

महायुती सरकारमधील मंत्र्यांकडून अनेक वादग्रस्त वक्तव्ये तसेच आक्षेपार्ह कृती केल्या जात आहेत. यावरून सध्या बराच गदारोळ सुरू आहे. विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. तर जनतेतही नाराजी आहे. मात्र, राजीनामा कुणाचाही घेतला जात नाही. शिवाय याबाबत बरीच सोयीस्कर आणि गोलमाल उत्तरे दिली जात आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधींची नैतिकता किंवा नीतीमूल्यांचा प्रश्न उपस्थित होत आहे. तीन-चार लाख जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे आमदार, मंत्री यांना सार्वजनिक जीवनात कसे राहायचे, काय बोलायचे याचे भान नसेल तर आणि जाणीव होत नसेल तर ही बाब खूप गंभीर आहे. महाराष्ट्र राज्य हे राजकीय नीतीमूल्य जपणारे राज्य होते, अशी म्हणण्याची वेळ आली आहे. मात्र, सत्तेतील तिन्ही पक्षांमधील मंत्री यात असल्यामुळे कोण कुणावर कारवाई करणार हा प्रश्नच आहे. त्यामुळे एका पक्षातील मंत्र्यावर कारवाई झाली तर दुसऱ्या पक्षातील नेत्यावरही करावी लागेल. त्यापेक्षा आपण सर्व भाऊ भाऊह्ल असा कारभार सुरू आहे. सध्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील मंत्र्यांच्या कारनाम्यांची जाहीर चर्चा सुरू आहे. यातील माणिकराव कोकाटे तर खूपच चर्चेत आहेत. त्यांचा राजीनामा घेणार, अशी चर्चा होती. मात्र, आता त्यांना



माफ केले असून पुन्हा चूक केली तर गय नाही, अशी समज दिल्याचे सांगण्यात येते.

प्रत्यक्षात शिवसेनेच्या मंत्र्यांच्या आरोपानंतर त्यांच्यावर कारवाई होत नसेल तर माज्याच मंत्र्यांवर कारवाई का, असा युक्तिवाद राष्ट्रवादीकडून झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे एकमेकांच्या चुका सांभाळून घेऊ, अशा पद्धतीने सरकारचा कारभार सुरू आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. सामाजिक न्यायमंत्री आणि शिवसेनेचे नेते संजय शिरसाट यांचा बेडरूममधील कथित पैशांच्या बॅगेसोबत फोटो असो किंवा विट्स हॉटेलचे प्रकरण असो किंवा शेंद्रा एमआयडीसीमधील भूखंड प्रकरण असो, ते कायम वादग्रस्त राहिले आहेत. शिवसेनेचे दुसरे नेते आणि बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांच्याकडून कॅन्टीन कर्मचार्याला मारहाण आणि एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांना फ्रीस्टाईल हाणामारीचे आवताण देणे हे कुठल्या लोकप्रतिनिधींच्या नियमात बसते. यावर प्रचंड वाद झाला, विधिमंडळात विषय चचेर्ला आला. मात्र, कारवाई काहीच नाही. एकनाथ शिंदे यांचे तिसरे मंत्री भरत गोगावले कथित अघोरी पूजेच्या व्हिडीओमुळे खूप चर्चेत आले. पालकमंत्री होण्याच्या त्यांच्या इच्छेला यामुळे काहीसा ब्रेक लागला आहे. तर शिवसेनेचे चौथे मंत्री योगेश कदम सध्या खूपच वादात आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब यांनी त्यांच्यावर सावली बारसंदर्भात आणि वाळू उपसा प्रकरणात विधिमंडळात आरोप केल्यानंतर गृह राज्यमंत्री योगेश कदम आणि त्यांचे वडील माजी आमदार रामदास कदम यांनी बराच आकांडतांडव केला.

आता तर अनिल परब यांनी आरोपासंदभार्तील पुरावे मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केल्याचा दावा केला आहे. मुख्यमंत्री ते पुरावे तपासतील, अशी अपेक्षा आहे. मात्र, एवढे गंभीर आरोप होत असतील आणि त्याचे पुरावे सादर केले जात असतील तर संबंधित मंत्री, त्यांचे नेते आणि मुख्यमंत्री नैतिक जबाबदारीचे पालन करतील, अशी अपेक्षा जनतेने केली तर त्यात अयोग्य काय? हे चारही आमदार शिवसेनेचे असल्यामुळे त्यांची जबाबदारी त्यांचे नेते एकनाथ शिंदे यांची आहे. त्याचप्रमाणे एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मंत्र्यांना कडक शब्दांत समज दिल्याचे सांगण्यात येते. इकडे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या रमीच्या डावाने महागोंधळ झाला आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सभागृहात माणिकराव कोकाटे मोबाईलवर रमीचा डाव खेळत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर खळबळ उडाली होती. याच माणिकरावांनी यापूर्वी अनेकदा वादग्रस्त वक्तव्ये करून पक्षाला आणि नेते अजित पवार यांना संकटात आणण्याचे काम केले होते. रमीच्या डावावरून त्यांनी पत्रकार परिषद घेत इन्कार केलाच, शिवाय आरोप करणाऱ्यांना न्यायालयात खेचण्याचा इशारा दिला होता. मात्र, त्याचवेळी शासन भिकारी असल्याचे ते म्हणाले आणि नव्या वादाला तोंड फुटले. यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नाराजी व्यक्त केली होती. त्याचवेळी कोकाटे यांचे मंत्रीपद जाण्याची जोरदार चर्चा सुरू झाली होती. प्रत्यक्षात काहीही घडले नाही. दुसरीकडे भाजपचे आमदार नितेश राणे यांनी अनेकदा धार्मिक द्वेष भडकावणारी वक्तव्ये केल्याचा आरोप आहे. मंत्रिपदाची शपथ घेताना त्या पदाला शोभणारे काम करू, जातीभेद, धर्मभेद मानणार नाही, अशी शपथ घेतली जाते. ही शपथ पुढे किती पाळली जाते, हा संशोधनाचा विषय आहे. नाशिकमधील हनी ट्रॅप प्रकरणाचीही मोठी चर्चा आहे. विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्यांनी राज्यपालांची भेट घेऊन कलंकित, भ्रष्टाचारी आणि असंवेदनशील मंत्री आणि आमदारांना बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या यादीत अनेक आमदारांचीही नावे आहेत. महायुती सरकार स्थापन होऊन सात महिने झाले आहेत. वादग्रस्त वक्तव्ये आणि मंत्री, आमदारांचे वादग्रस्त वागणे हे सर्व याच कालावधीतील आहे. त्यांच्यावर मुख्यमंत्र्यांनी कुठलीही कारवाई केलेली दिसत नाही. सर्वजण सत्ताधारी पक्षांचे असल्याने बहुधा एकाच बोटीचे प्रवासी आहेत. एकत्र प्रवास करणार असल्याने एकमेकांना सांभाळून घेण्याचा अलिखित करार त्यांच्यात झालेला असावा. त्यामुळे जनतेपर्यंत काय संदेश गेला आणि पुढे काय जाईल, हे सरकार अजून ध्यानात घेत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे.

# बनावट लाभार्थींनी केला सरकारचा फजित वडा

लाडकी बहीण योजनेचे जे व्हायचे ते अखेर झाले. कारण तेच होणार हे अपेक्षितच होते. आता फक्त इतकेच उरले आहे की, सरकार एक दिवस घोषित करेल की, आम्ही लाडकी बहीण योजना बंद करत आहोत. कारण त्यातच सरकारचे आणि जनतेचे हित असणार आहे, पण ही नामुष्की राज्य सरकार कशी स्वीकारणार हा मोठा प्रश्न आहे, पण एकदाच काय ती नामुष्की होईल, पण निदान कार्यकाळ पूर्ण करेपर्यंत सरकारचे कामकाज तरी व्यवस्थित चालवणे शक्य होईल. सरकारच्या सगळ्या खात्यांना योग्यरित्या काम करता येईल. मुळात लाडकी बहीण योजना ज्यावेळी आणि ज्या पद्धतीने लागू करण्यात आली, ते पाहता त्यात प्रचंड घोळ होणार आणि फसवाफसवी होणार, हे सुज्ञास सांगण्याची गरज नव्हती. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सपाटून मार खाल्ल्यानंतर त्यापाठोपाठ येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आपला दणकून पराभव होणार हे दिसत असल्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारसमोर मोठे संकट उभे राहिले होते. अगोदर लोकसभा निवडणुकीत ४०० पार करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दावा फोल ठरला होता. त्यात पुन्हा महाराष्ट्रात सपाटून पराभव होणार याची चिन्हे दिसू लागली होती. अशा वेळी निवडणुकीच्या तोंडावर मध्य प्रदेशमध्ये यशस्वी ठरलेली लाडली बहनचा फॉम्युर्ला महाराष्ट्रात वापरण्यात आला. अर्थात, त्यामागे भाजप नेत्यांचे डोके असणार हे काही वेगळे सांगण्याची गरज नाही. मुळात राज्यात जे महायुती सरकार सत्तेवर आले होते, ते भाजपमुळेच आलेले होते. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना शिंदेंच्या नेतृत्वाखाली लागू झाली असली तरी हे भाजपचे ब्रेन चाईल्ड आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. लाडकी बहीण योजनेमुळे महायुती सरकारच्या हातातून गेलेली विधानसभा निवडणुकीची मॅच शेवटच्या ओव्हर्समध्ये जिंकता आली. पुढे शिंदे राज्यातील बहिणीचा लाडका भाऊ म्हणून उदयाला आले, पण त्यांना पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळाले नाही. अर्थात, त्याविषयीची नाराजी त्यांनी सुरुवातीला दाखवून दिली होती. लाडकी बहीण योजना जशी मध्य प्रदेशात यशस्वी ठरली तशी ती महाराष्ट्रात यशस्वी ठरली आणि महायुतीची सत्ता राज्यात पुन्हा आली. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. जेव्हा त्यांनी राज्याचा गाडा हाकायला घेतला तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, लाडक्या बहिणींना दरमहिन्याला मनीऑर्डर पाठवताना सरकारची फारच दमछाक होऊ लागलेली आहे. त्यावेळी मग त्यांनी लाडक्या बहीण या योजनेसाठी जे निकष लावले होते त्याची तपासणी करायला सुरूवात केली. त्यातून मग ज्या बहिणी पात्र ठरत नाहीत, त्यांना या योजनेतून बाद करण्यात आले. पण तोपर्यंत त्या बहिणींनी पैसे खाऊन टाकले होते. त्यांच्या खात्यातून ते परत घेतलेले नाहीत. कारण ज्या बहिणींनी सरकारची फसवणूक केली त्यांचाही रोष सरकारला ओढवून घ्यायचा नव्हता. त्यामुळे काहीजणींचा पत्ता कट करून बाकींच्याचे पैसे देणे सुरू ठेवले. पण पुढे जशी या योजनेची अधिक छाननी करण्यात येऊ लागली तेव्हा त्यात मोठ्या प्रमाणात या योजनेचा गैरफायदा घेण्यात आल्याचे उघडकीस येऊ लागले. ही अवजड योजना चालू ठेवण्यासाठी प्रसंगी दुसऱ्या खात्यांचा निधी वळवण्यात आला. त्यानंतर त्या खात्यांना निधीचा तुटवडा भासू लागल्यावर त्या खात्याचे मंत्री आरडोओरड करू लागले. त्यामुळे या लाडक्या बहीण योजनेने सरकारचीच कोंडी केली. आता या लाडकी बहीण योजनेचा जो बट्ट्याबोळ झाला आहे, त्यावरून या योजनेला अशी ही बनवाबनवी नाव द्यावे लागेल. कारण विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीतील तिन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन अनेक महिलांचे या योजनेसाठी अर्ज भरून घेतले. त्यावेळी त्यांनी निकषांचा विचार केला नाही. कारण त्यावेळी महायुतीला महिलांची आणि त्यांच्या कुटुंबीयांची मते हवी होती, खरे तर निवडणुकीपूर्वी अचानक अशी पैसे देणारी योजना जाहीर करून मते आपल्याकडे वळवणे ही लोकांची फसवणूक होती. पण जसे म्हणतात, करावे तसे भरावे. तसेच सरकारचे झाले आहे. कारण महायुतीने लोकांची फसवणूक करून त्यांची मते मिळवली, तशीच लोकांनीही कुठलाही विचार न करता या योजनेत घुसखोरी करून सरकारकडून पैसे लुबाडले. या याजनेतील २ कोटी ५२ लाख लाभार्थींपैकी तब्बल २६ लाख ३४ हजारजणी आता विविध कारणांनी अपात्र ठरल्या आहेत. यातही पुन्हा धक्कादायक गोष्ट म्हणजे १४ हजार २९८ पुरुषांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे उघड झाले आहे. जे लाभार्थी या योजनेला पात्र नव्हते त्यांनी अशी घुसखोरी करून जे पैसे मिळवले त्यामुळे वर्षभरात सरकारचे ४ हजार ८०० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे सरकारमधील उच्च पदस्थांचे म्हणणे आहे. महिला व बाल कल्याणमंत्री अदिती तटकरे यांनी स्वतःच अपात्र लाभार्थींची यादी जाहीर केली.

# ओबीसी आरक्षणासह महापालिका निवडणुकांबाबत सर्वात मोठी बातमी, सुप्रीम कोर्टाने पाहा काय म्हटलं?

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी बातमी समोर येत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून प्रभागरचना आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्दावरुन राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. यामुळे अनेक महापालिकांच्या निवडणुका तब्बल चार ते पाच वर्षांपासून रखडल्या आहेत. तिथे प्रशासकीय शासन सुरु आहे. मधल्या काळात कोरोना संकटामुळे या निवडणुका रखडल्या. नंतर ओबीसी आरक्षण आणि प्रभागरचनांच्या कारणास्तव या निवडणुका रखडल्या. सुप्रीम कोर्टात या प्रकरणी सुनावणी सुरु होती. अखेर सुप्रीम कोर्टाने याच प्रकरणी आज महत्त्वाचे आदेश दिले आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग आता मोकळा झाला आहे. राज्यात महापालिका, नगर पालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका या जुन्या की नव्या प्रभागरचनेनुसार पार पाडाव्यात? याबाबत अनेक मतभेद होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आधीच्या नेतृत्वातील सरकारने नवी प्रभागरचना आखली होती. पण महाविकास आघाडी सरकारने ती प्रभागरचना रद्द करत नवी प्रभागरचना आखली. पण नंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार अस्तित्वात आल्यानंतर फडणवीस सरकारने आखलेली नवी प्रभागरचना लागू करण्यात आली. त्याला सुप्रीम कोर्टात




आव्हान करण्यात आलं होतं. तेव्हा पासून हे प्रकरण न्याय प्रविष्ट होतं. अखेर सुप्रीम कोर्टाने याबाबत महत्त्वाचे आदेश आज दिले आहेत.

**कोर्टाचा निकाल नेमका काय?**

महापालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद निवडणुका नव्या प्रभागरचनेनुसार करण्यास सुप्रीम कोर्टाने मंजुरी दिली आहे. नवीन प्रभागरचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळल्या आहेत. विशेष म्हणजे या निवडणुका ओबीसी आरक्षणासासह घेण्याचे आदेश सुप्रीम कोटार्ने दिले आहेत. त्यामुळे आगामी निवडणुका या नव्या प्रभारचनेनुसार असतील.

गेल्यावेळी सुप्रीम कोटार्चा आदेश आला त्यावेळी कोर्टाने पूर्वी जसं २७ टक्के आरक्षण होतं त्यानुसार निवडणुका घेण्यात याव्यात, असा आदेश दिला होता. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न घटनात्मकदृष्ट्या चॅलेंज केला गेला आहे. तो प्रश्न तसाचा तसा राहील. २७ टक्के आरक्षणानुसार निवडणुका घेण्याचे आदेश कोर्टाने दिले होते. पण प्रभागरचेवरुन वाद होता. नवी प्रभारचना ठेवायची की जुनी ठेवायची? याबाबत वाद होता. अखेर कोटार्ने याबाबत आदेश दिले आहेत.

प्रभागरचना कशी ठेवायची त्याचा निर्णय तिथल्या राज्य सरकारचा असेल. राज्य सरकारने ठरवलेल्या प्रभागरचनेनुसार निवडणुका होतील. तसेच २७ टक्के आरक्षणाला आव्हान देणारी याचिका दाखल करण्यात आली होती. पण त्यावर सुप्रीम कोर्टाने म्हटलं की, याआधीच आम्ही २७ टक्के आरक्षणाने निवडणुका होतील. राज्याच्या निवडणुक आयोगाकडून निवडणुका होतील.

## नोकरीचे आमिष दाखवत ऑनलाईन गंडा तर नेटबँकिंगची लिंक पाठवून लाखांची फसवणूक

■**मुंबई । प्रतिनिधीः**

गेल्या काही काळात मुंबईसारखी शहरामध्ये सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होताना दिसत आहे. सरकारकडून सायबर गुन्हे कमी करण्यासाठी महत्त्वाची पाऊले उचलताना दिसत आहे, तर दुसरीकडे अनेकजण या सायबर गुन्ह्याचे बळी पडत आहेत. मुंबईमध्ये दोन अशा घटना समोर आल्या आहेत. टेलिग्रामवर नोकरीचे आमिष दाखवत एका तरुणाची तब्बल ६ लाखांची ऑनलाईन फसवणुक झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी मुख्य आरोपीला गोवा येथून ओशिवरा पोलिसांनी अटक केली. तसेच, नेटबँकिंगची लिंक पाठवून सुमारे साडे ८ लाखांची एका वयोवृद्धाची फसवणुक झाल्याचा प्रकार घाटकोपर परिसरात उघडकीस आला आहे.

टेलिग्रामवर नोकरीचे आमिष दाखवत तरुणाची अंदाजे ६ लाखांची फसवणूक केली. त्यानंतर अमन पास्कर परमार या २३ वर्षीय तरुणाला पोलिसांनी गोव्यातून अटक केली. तो मध्यप्रदेशमधील इंदोरचा रहिवाशी आहे. फसवणुकीच्या गुन्ह्यांत आरोपीला स्थानिक न्यायालयाने ४ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. यातील तक्रारदार जोगेश्वरी परिसरात राहतो. जून महिन्यांत तो त्याच्या घरी होता. यावेळी त्याला विजय नावाच्या एका व्यक्तीने फोन करुन टेलिग्रामवर नोकरीचे आमिष दाखविले होते. घरबसल्या विविध रेस्ट्रॉरंटला रेटींग देण्यास सांगून त्याला चांगले कमिशन देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे त्यांनी संबंधित लिंकवर



विविध रेस्ट्रॉरंटला रेटींग दिले होते, त्यात त्याला चांगले कमिशन मिळाले होते. त्यानंतर जास्त कमिशन देण्याचे गाजर दाखवून वेगवेगळ्या टास्कसाठी बँक खात्यात पैसे ट्रान्स्फर करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे त्याने ६ लाख ९ हजार रुपयांची गुंतवणुक करुन त्याचे सर्व टास्क पूर्ण केले. पण, ते टास्क पूर्ण करुन त्याला मूळ रक्कमेसह कमिशनची रक्कम मिळाली नाही. फसवणुकीचा हा प्रकार लक्षात येताच त्याने ओशिवरा पोलिसांत तक्रार केली होती. याप्रकरणी फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा दाखल होताच पोलिसांनी आरोपीचा शोध सुरु केला होता. मिळालेल्या माहितीवरुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रितम बानावली, पोलीस निरीक्षक प्रभात मानकर यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक शरद देवरे, सहाय्यक फौजदार अशोक कोंडे, शिपाई विक्रम सरनोबत, स्वप्नील काकडे यांनी गोवा येथून अमर परमारला चौकशीसाठी ताब्यात घेतले. चौकशीमध्ये या गुन्ह्यांत त्याचा सहभाग उघडकीस आला. याच गुन्ह्यांमध्ये अटक केल्यानंतर त्याला पुढील चौकशीसाठी मुंबईत आणण्यात आले. अटकेनंतर त्याला अंधेरीतील स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. त्याच्याकडून पोलिसांनी एक मोबाईल, सिमकार्ड जप्त केला आहे.

**नेटबँकिंगची लिंक पाठवून लाखांची फसवणुक**

नेटबँकिंगची लिंक पाठवून सुमारे साडे ८ लाखांची एका वयोवृद्धाची फसवणुक झाल्याचा प्रकार घाटकोपर परिसरात उघडकीस आला. यप्रकरणी या वयोवृद्धाच्या तक्रारीवरुन घाटकोपर पोलिसांनी फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरु केला. ६८ वर्षांचे वयोवृद्ध तक्रारदार घाटकोपर येथे राहत असून त्यांचे वडिल एका खाजगी बँकेतून निवृत्त झाले. त्यानंतर त्यांना पेंशन मिळत होती. अनेकदा ते त्यांच्या बँकेतून पैसे काढून त्यांच्या वडिलांना आणून देत होते. त्यांच्याकडे नेटबँकिंग सुविधा नव्हती. त्यामुळे ही सुविधा घेण्यासाठी त्यांनी बँकेच्या वेबसाईटवर सर्च केले. यावेळी त्यांना एक मोबाईल क्रमांक मिळाला होता. या व्यक्तीने त्यांना नेटबँकिगसाठी मदतीचे आश्वासन देत त्यांना एक लिंक पाठवली. ही लिंक ओपन केल्यानंतर त्यात एक ॲप सुरु झाले. त्यामुळे त्यांनी ॲपमध्ये त्यांच्यासह त्यांच्या बँक खात्याची माहिती अपलोड केली. पण त्यांना काही माहिती अपलोड करता आली नाही, त्यामुळे त्यांनी मोबाईल बंद करुन इतर माहिती अपलोड केली नाही. २९ जुलैला त्यांच्या वडिलांच्या मोबाईलवर बँकेचे मॅसेज आले. त्यामध्ये त्यांच्या बँक खात्यातून ६ ऑनलाईन व्यवहार होऊन साडे ८ लाख रुपये गेल्याचे कळले. हा प्रकार संशयास्पद वाटताच त्यांनी बँकेत जाऊन पाहणी केली असता नेटबँकिंग सुविधा देण्याचे आमिष दाखवून अज्ञात व्यक्तीने त्यांना एक लिंक पाठवून त्यांच्या बँक खात्याची माहिती घेऊन ही फसवणुक केल्याचे उघडकीस आले.

## कामावर जाताना तरुणासोबत अघटित घडलं

■**छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधीः** एका भीषण रस्ते अपघातात एका तरुणाचा दुदैर्वी अंत झाला. हा तरुण छत्रपती संभाजीनगरवरून जांभळा या गावात खडी क्रेशर केंद्राकडे स्पोर्ट बाईकने जात होता. त्यावेळी भरधाव बाईक ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला पाठीमागून धडकल्याने हा भीषण अपघात झाला. ही घटना धुळे सोलापूर महामार्गावर फतियाबाद बस स्टॅन्ड जवळ रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. कुटुंबातील कर्ता मुलगा गेल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, ऋषिकेश सचिन चोरडिया (वय २४रा. अहिंसा नगर छत्रपती संभाजीनगर) असे अपघातात ठार झालेल्या तरुणाचं नाव आहे. या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार,



ऋषिकेश हा स्पोर्ट बाईक एम.एच.२०एच.इ.०००९ या दुचाकीने घरातून निघाला. तो छत्रपती संभाजीनगर शहरातून पाचपिरवाडी जांभळा येथे खडी क्रेशर मशीनच्या सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी जात होता. धुळे सोलापूर महामार्गाने जात असताना भरधाव दुचाकी ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला पाठीमागून धडकली. या भीषण अपघातामध्ये ऋषिकेश व त्याच्या दुचकीचं मोठं नुकसान झालं. ऋषिकेश रस्त्यावर पडला असताना त्याच्या पॅन्टला देखील आग लागली होती. यावेळी नागरिकांनी तात्काळ पाणी टाकून आग विझवली. त्यानंतर ग्रामस्थांनी त्याला जखमी अवस्थेत जगद्गुरु नरेंद्राचार्य संस्थानाच्या रुग्णवाहिकेतून छत्रपती संभाजीनगर शहरातील एमजीएम रुग्णालयात दाखल केले. यावेळी डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. ऋषिकेश हा घरात करता मुलगा होता. कुटुंबातील व्यवसाय तो स्वतः बघत होता. करता मुलगा गेल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्याच्या पश्चात आई वडील एक लहान भाऊ असा परिवार आहे.

## लग्न केलं नाहीस तर आपले फोटो तुज्या घरी पाठवेन; विद्यार्थिनीने रुमवर आयुष्य संपवलं

■**छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधीः** बी फार्मसीच्या तिसऱ्या वर्षाचं शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीचा तिच्या ओळखीतील तरुणाकडून वारंवार छळ केला जात होता. माज्यासोबत लग्न कर, लग्न केले नाही तर तुझे व माझे काही फोटो तुज्या घरी दाखवेन, तुला बदनाम करेन, अशी धमकी तरुणाने दिली. या कारणाने विद्यार्थिनीने तिच्या रुमवर गळफास घेऊन आत्महत्या केल्याचं समोर आलं आहे. आत्महत्या करणाऱ्या तरुणीचे नाव कल्याणी वायाळ असून तिला त्रास देणाऱ्याचे नाव सुरज उर्फ शुभम मोरे (रा. मुळ गाव, देवगाव खवणे, ता. मंठा, जि. जालना) असे आहे.

या प्रकरणी मृत कल्याणी वायाळ हिची मोठी बहिण प्रतिक्षा परमेश्वर वायाळ, वय २४ वर्ष, रा. परिजात कॉलनी, सेलू, परभणी,



हिने दिलेल्या तक्रारीनुसार, तिची बहीण ही बीफार्मसीच्या तिसऱ्या वर्षात शहरात शिकत होती. ती ग्रीव्हज कॉलनी, एन ७ येथील एका रुमवर तिच्या मैत्रिणीसोबत राहत होती.

३० जुलै रोजी दुपारी दीड वाजताच्या सुमारास प्रतिक्षाला कल्याणीच्या रुमवरील मैत्रिणींनी कॉल केला आणि तिची तब्येत खराब आहे, तुम्ही लवकर या असे सांगितले. प्रतिक्षा वायाळ यांनी कल्याणीच्या फोनवर कॉल केला असता, पोलिसांनी तिने गळफास घेतल्याचे सांगितले.

कल्याणी वायाळ हिची सुरज मोरे याच्यासोबत चार ते पाच वर्षांपासून मैत्री होती. सुरज हा छत्रपती संभाजीनगरला असताना त्याची कल्याणीसोबत ओळख झाली होती. सुरज तिला लग्नासाठी मागे लागला होता. माज्यासोबत लग्न केलं नाहीस, तर तुझी बदनामी करेन, अशी धमकी देत होता. या मानसिक छळामुळे कल्याणीने आत्महत्या केल्याची माहिती तक्रारीत देण्यात आली आहे. या प्रकरणी सुरज मोरेच्या विरोधात सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक अनिल रमेश नेनेकर हे करीत आहेत.

**पंधरा दिवसापूर्वी कल्याणीने दिली होती त्रासाची माहिती**

पंधरा दिवसांपूर्वी कल्याणी ही सावरगाव, ता. मंठा येथे आली होती. कल्याणी ही त्रस्त दिसत असल्याने प्रतिक्षा हिने तिला काही त्रास आहे का? अशी विचारणा केली. कल्याणी हिने बऱ्याच वेळेनंतर मोठ्या बहिणीसमोर तिची व्यथा मांडली. तिची ओळख सुरज मोरे याच्याशी चार ते पाच वर्षांपासून होती. सुरज नेहमीच फोन करतो, माज्यासोबत का बोलत नाहीस? तुज्यासोबत लग्न करायचे आहे, तू लग्न केले नाही, तर तुझे-माझे फोटो तुज्या घरच्यांना पाठवून तुझी बदनामी करेल अशी धमकी दिल्याचे तिने सांगितले.

**रक्षाबंधनापर्यंत मी तिथे राहते**

कल्याणीने प्रतिक्षेला सर्व त्रासाबाबत सांगून, दिदी आई बाबांना कळालं तर खुप त्रास होईल. मी रक्षाबंधनापर्यंत छत्रपती संभाजीनगर येथे राहते. त्यानंतर गावातच राहिल. असे सांगितले.

## १६ वर्षीय मुलाने आईसमोर डोंगरावरून उडी घेत जीवन संपवलं, माऊलीने जागीच टाहो फोडला

■**छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधीः**

आईने नवीन मोबाईल घेऊन देण्यास नकार दिल्याने अकरावीत शिक्षण घेणाऱ्या सोळा वर्षीय विद्यार्थ्याने आईसमोर खवड्या डोंगरावरून उडी घेऊन आत्महत्या केली. ही घटना तिसगाव येथील खवड्या डोंगर येथे घडली. आई समोर मुलाने टोकाचे पाऊल उचलल्यामुळे नागरिकांनी हळहळ व्यक्त केली.

**आई-वडील विभक्त रहात होते**

अथर्व गोपाल तायडे (वय १६, वडगाव) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. या प्रकरणी अधिक माहिती अशी की, तायडे कुटुंबीय हे मूळचे बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद येथील रहिवासी आहे. गोपाल तायडे व पत्नी शितल



तायडे यांच्यात वाद झाल्याने हे विभक्त राहतात. अथर्व हा त्यांचा एकुलता एक मुलगा होता. तो सध्या शरणपूर येथील दिल्ली पब्लिक स्कूल येथे अकरावीच्या वर्गात शिकतो.

**आईने घटनास्थळी टाहो फोडला**

अथर्वने आईकडे नवीन मोबाईल घेण्याची इच्छा व्यक्त केली होती. आईने मोबाईल घेऊन देण्यास नकार दिल्याने रागाच्या भरात अथर्व खवड्या डोंगराकडे धावत सुटला. आईने त्याचा पाठलाग केला मात्र तोपर्यंत त्याने खवड्या डोंगरावरून उडी मारून आत्महत्या केली होती. पोटच्या गोळ्याने डोळ्यादेखत जीव गमावल्याने अथर्वच्या आईने घटनास्थळी टाहो फोडला.

**घटनेमुळे गावात हळहळ**

अकरावीत शिकणाऱ्या अथर्वने मोबाईल न दिल्याच्या कारणावरून आईसमोर डोंगरावरून उडी मारून आत्महत्या केली. ही बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त करण्यात आले आहे.

**मोबाइलवर व्हिडीओ बनवून आत्महत्या**

दुसरीकडे, उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज येथे राहणाऱ्या अमर मुळेने आत्महत्या केल्याचं समोर आलं आहे. त्याने वांगी गायरान झुडपामध्ये आत्महत्या करत आपली जीवनयात्रा संपवली. आत्महत्या करण्यापूर्वी आत्याच्या मुलाच्या मोबाइलवर व्हिडीओ व आत्महत्या करत असल्याच्या ठिकाणाचे लोकेशन पाठवले. अमरच्या आत्महत्येने नान्नज परिसरात खळबळ उडाली आहे. . विशेष म्हणजे अवघ्या दोन महिन्यांपूर्वीच त्याचा विवाह झाला हता या व्हिडिओमध्ये तरुणाने पाच जणांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करत असल्याचं सांगितलं.

## माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांना ईडीचे समन्स




■**वसई । प्रतिनिधीः**

वसई-विरार महापालिकेचे माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या निवासस्थानासह १२ ठिकाणी ईडीने मंगळवार २९ जुलै रोजी छापे टाकले होते. या प्रकरणानंतर ईडीने पवार आणि त्यांच्या पत्नी भारती पवार यांना समन्स बजावले आहे. त्यांना सोमवारी ४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता मुंबईच्या वरळी येथील ईडी कार्यालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नालासोपारा येथील ४१ अनधिकृत इमारती प्रकरण घोटाळ्यानंतर वसई- विरार शहरात ईडीचे धाड सत्र सुरू आहे. सुरूवातीला ईडीने प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँड्रींग कायद्याअन्वये तत्कालीन नगररचना उपसंचालक वाय एस रेड्डी यांच्या हैद्राबाद येथील घरावर छापे घातले होते. यात रेड्डी यांच्याकडे कोट्यवधी रुपयांचे घबाड हाती लागले होते. त्यापाठोपाठ २९ जुलैला ईडीने याप्रकरणी वसई-विरार महापालिकेचे माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या निवासस्थानासह १२ ठिकाणी छापे टाकले. त्यात १ कोटी ३३ लाख रुपये व कागदपत्रे जप्त करण्यात आली होती. याशिवाय ईडीने केलेल्या तपासात शहरात बांधकाम व्यावसायिकांकडून परवानगी देण्यासाठी प्रति चौरस फुटा मागे पैसे घेतले जात होते. यात अनिलकुमार पवार यांना फुटा मागे २५ रुपये तर नगररचना संचालक यांना १० रुपये अशा स्वरूपात एकूण ३५ रुपये प्रतिचौरस फुटामागे आकारले जात असल्याचे निष्पन्न झाले आहे.

## पुणे हादरले, आंतरजातीय विवाह केल्याने घरच्यांनीच केले मुलीचे अपहरण

■**पुणे। प्रतिनिधीः**

गेल्या काही दिवसांमध्ये राज्यात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यातही विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात तर नेहमीच गुन्हे घडत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे गुन्ह्यांमुळे चर्चेत असणाऱ्या पुण्यात पुन्हा एकदा जिल्ह्याला हादरवणारी घटना घडली आहे. पुण्यातील खेडमध्ये आंतरजातीय प्रेमविवाह केल्यामुळे एका २८ वर्षीय तरुणीचे तिच्याच घरच्यांनी अपहरण केले असल्याची माहिती समोर आली आहे.

त्याशिवाय, तिच्या नवऱ्याला सुद्धा तिच्या



माहेरच्यांनी मारहाण केल्याचे सांगण्यात येत आहे. तरुणीचे तिच्या घरच्यांनी अपहरण करतानाचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हारल होत असून या प्रकरणाचा पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, विश्वनाथ गोसावी (वय वर्ष ३९) आणि त्याची बायको प्राजक्ता गोसावी (वय वर्ष २८) हे दोघेही पुण्यातील खेडमध्ये वास्तव्यास आहेत. या दोघांनी वर्षभरापूर्वी म्हणजे ५ ऑगस्ट २०२४ रोजी आळंदी या ठिकाणी वैदिक पद्धतीने विवाह केला होता. पण हे लग्न मुलीच्या घरच्यांना मान्य नव्हते. याच कारणातून ३ ऑगस्टला विश्वनाथ यांना बेदम मारहाण करण्यात आली. मारहाण करणाऱ्यांमध्ये मुलीच्या दोन भावांसह आई आणि इतर १५ जणांचा समावेश आहे. मुलीने पळून जाऊन आंतरजातीय विवाह केल्यामुळे समाजात आपली बदनामी झाल्याचा राग त्यांच्या मनात होता. यातूनच त्यांनी प्राजक्ता आणि विश्वनाथ यांना आधी मारहाण केली. त्यानंतर त्यांनी प्राजक्ताचे अपहरण केले.

भरचौकात प्राजक्ताच्या घरच्यांनी विश्वनाथला जबर मारहाण केली. ज्यामुळे तो जखमी झाला आहे. तर, विश्वनाथला मारहाण करून प्राजक्ताच्या आईने आणि भावाने काही लोकांच्या मदतीने तिचे अपहरण केले. प्राजक्ता गोसावी हिचे अपहरण करताना काही लोकांनी तो व्हिडीओ काढला आहे.

ज्यानंतर हा व्हिडीओ आता व्हायरल होत आहे. या प्रकरणी खेड पोलीस ठाण्यामध्ये मुलीचा भाऊ आणि आईसह १५ जणांविरोधात अपहरण आणि जबर मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com